गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष २ रे | अंक १०५ वा | रविवार ०१ सप्टेंबर २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 105 | Date : 01/08/2024 | blow Sunday |Page 4 Price 4

## आर्थिक सक्षमीकरणासोबतच महिलांच्या सुरक्षिततेचा निर्धार : मुख्यमंत्री शिंदे



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

नागपूर : मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेसह इतर विविध योजनांच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करण्याचा राज्य सरकारचा निर्धार आहे. महिलांना आर्थिक स्वावलंबी करतांनाच त्यांच्या सुरक्षिततेबाबत आम्ही अत्यंत संवेदनशील असून त्यासाठी सर्व पातळ्यांवर कठोर उपाययोजना करण्यात येत आहेत, अशी नि:संदिग्ध ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज नागपूर येथे 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेच्या दुसऱ्या टप्प्याच्या लाभ वितरण कार्यक्रमात दिली.

रेशीमबाग मैदानावर आज मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेच्या दुसऱ्या टप्यातील लाभाचे प्रातिनिधिक स्वरुपात वितरण करण्यात आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झालेल्या या कार्यक्रमास केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, ग्रामविकास व पर्यटन मंत्री गिरीश महाजन, अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या महिला भगिनींना अभिवादन करुन मुख्यमंत्री म्हणाले, या योजनेच्या पहिल्या टप्प्यात १ कोटी ७ लाख भगिनींच्या खात्यात लाभाची ३ हजार २२५ कोटी इतकी रक्कम जमा करण्यात आली आहे. आज दुसऱ्या टप्यात ५२ लाख भगिनींच्या खात्यात १५६२ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. अशा पद्धतीने १ कोटी ६० लाख महिलांना या योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळाला आहे. राज्याच्या तिजोरीचा लाभ सर्वसामान्य जनतेला मिळायलाच हवा. या योजनेच्या उत्तम । पान २ वर

## हरियाणा विधानसभा निवडणुकीबाबत निवडणूक आयोगाचा मोठा निकाल

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**





नवी दिल्ली :हरियाणा विधानसभेच्या मतदानाची तारीख आता बदलण्यात आली आहे. याआधी घोषणा झाल्यानुसार १ ऑक्टोबर रोजी मतदान आणि ४ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार होती. मात्र आता ५ ऑक्टोबर रोजी मतदान आणि ८ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे. जम्मू आणि काश्मीरचीही मतमोजणी आता ८ ऑक्टोबर रोजीच होईल, असे निवडणूक आयोगाने जाहीर केले आहे.

बिश्नोई समाजाने १ ऑक्टोबरच्या मतदानावर आक्षेप घेतला होता. अखिल भारतीय बिश्नोई महासभा, बिकानेर या संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्षांनी शिष्टमंडळासह निवडणूक आयोगाकडे तारीख बदलण्याची मागणी केली होती. २ ऑक्टोबर रोजी बिश्नोई समाजाचा मोठा सण आहे. यासाठी हजारो बिश्नोई कुटुंब राजस्थानमधील त्यांच्या मूळ गावी असतात. शेकडो वर्षांपासून समाजातर्फे हा सण साजरा करण्यात येत आहे. यामुळे बिश्नोई समाजाचा मतदानाचा अधिकार हिरावला जाण्याची शक्यता आहे. या मागणीनंतर निवडणूक । पान २ वर

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग करून, जीवे मारण्याची धमकी

### इंदापूर तालुक्यातील माणुसकीला काळीमा फासणारी घटना

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**



इंदापुर (भिगवण)/अतुल सोनकांबळे: बदलापूर येथे घडलेल्या अत्याचाराचे प्रकरण ताजे असतानाच भिगवण पोलीस ठाण्याच्या अंतर्गत मदनवाडी येथे अल्पवयीन मुलीचे कपडे फाडून मुलीच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असा प्रकार घडला आहे. त्यामुळे भिगवण व भिगवण परिसरात महिला सुरक्षित आहे की नाही असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

सदर मुलीच्या फिर्यादी चुलत भावालाही जबरदस्त मारहाण करण्यात आली आहे.

पोलीस ठाण्यात तक्रार दिली तर तुला जिवंत मारून टाकू अशी धमकी आरोपींनी दिली आहे. याबाबत भिगवण पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल करण्यात आली असून आरोपी रोहन बाळासो गायकवाड, अमित पदमसिंह देवकाते, अतुल अंकुश देवकाते, धिरज (अविनाश) अंकूश देवकाते, लहू अर्जुन देवकाते, । पान २ वर

### जिल्हास्तरीय रानभाजी व मिलेट महोत्सव २०२४....

## प्रत्येक नागरिकांनी आपल्या दैनंदिन आहारात रानभाज्या व तृणधान्याला अधिक महत्त्व द्यावे : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

✻ जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते रानभाजी व मिलेट महोत्सवाचे उद्घाटन, मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित तर नागरिकांचा ही उत्स्फूर्त प्रतिसाद ✻ कृषी विभाग व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः सुदृढ व निरोगी आरोग्यासाठी रानभाज्या व तृणधान्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकांनी आपल्या दैनंदिन आहारात रानभाज्या व तृणधान्याला अधिक महत्त्व द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले. कृषी विभाग व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. निर्मल कुमार फडकुले सभागृहामध्ये आयोजित रानभाजी व मिलेट महोत्सव उद्घाटन प्रसंगी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद बोलत होते. यावेळी पुणे येथील आत्माचे संचालक अशोक किरनळी, जिल्हा कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने, आत्मा प्रकल्प संचालक मदन मुकणे, उपसंचालक शितल चव्हाण, पर्यवेक्षक अनिता शेळके नीलिमा हरसंगमा, मोहोळ कृषी विज्ञान केंद्राचे दिनेश क्षिरसागर यांच्या सह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, रानभाज्या मध्ये औषधी गुण आहेत, त्यामुळे आरोग्यासाठी । पान २ वर

## परस्थिती कसे ही असो, प्रामाणिक जिद्द असेल यशस्वी होता येईल पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे

### वसंत भांगे यांच्या स्मृती दिना निमित सिद्धार्थ सोशल फाउंडेशनच्या वतीने शालेय साहित्य वाटप



सदर कार्यक्रमामध्ये निर्भया पथकाचे टीमने शालेय मुलींना त्याच्या सुरक्षितेबाबत मार्गदर्शन केले मुली महिला कुठल्याही प्रकारच्या संकटात असल्यास निर्भया पथक चोवीस तास आपल्या सेवेत असून कुठल्याही प्रकारची भीती न बाळगता बिन्धास्त शिक्षण घ्यावे कुणी छेडछाड करत असेल तर न भीता आई वडील शिक्षक यांना आपले तक्रार सांगा आम्ही तुमच्या सोबत आहे – सन्ना मियावाले, निर्भया पथक पोलीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधी : परस्थिती कसे ही असो, प्रामाणिक जिद्द असेल यशस्वी होता येईल असे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांनी म्हणाले

बुध्दवाशी वसंत भांगे यांच्या अकराव्या पुण्यतिथी निमित्त सिद्धार्थ सोशल फाउंडेशनच्या वतीने श्री एस एस शेळके प्रशाला व ज्यू कॉलेज वागदरी येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते कार्यक्रम अध्यक्षस्थानी शेळके प्रशालेचे चेअरमन बसवराज शेळके हे होते प्रमुख उपस्थिती प्रदीप जगताप, बसवराज सोनकांबळे, उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, पर्यवेक्षिका शैलशिल्पा जाधव, नीजप्पा गायकवाड, शणापा मंगाणे, पोलीस हवालदार अंगद गीते, चंद्रशेखर भांगे प्राचार्य अनिल देशमुख होते पुढे म्हणाले की विद्यार्थीने आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जिद्दीने अभ्यास केले पाहिजे यशस्वी होण्यासाठी गरीब श्रीमंत काही नसतो प्रामाणिक अभ्यास केल्यास यशस्वी होतो त्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे आज काल मुल मोबाईलचे गैरवापर करत असून मोबाईलचे वापर अभ्यासासाठी न करत फेसबुक व्हॉटसाप मध्ये वेळ घालत आहेत

शाळेतील मुलीने न घाबरता त्याच्यावर अन्याय झाल्यास वडिलांना शिक्षकांना सांगितले पाहिजे तुम्हाला कुठल्याही प्रकारच्या अडचण समस्या असल्यास आमचे निर्भया पथक तुम्हाला मदत करण्यासाठी चोवीस तास आहे प्रामाणिक जिद्दी अभ्यास करून वडिलाचे गावाचे नाव रोशन करावे चंद्रशेखर भांगे हे गेल्या अनेक वर्षापासून सिद्धार्थ सोशल फाउंडेशन माध्यमातून दर वर्षी शालेय मुलांना स्कूल बॅग, शालेय साहित्य, वाटप करता हे कौतुकास्पद आहे यावेळी पोलीस हवालदार लक्ष्मण कांबळे, चिदानंद उपाध्ये,महादेव सोनकवडे, नितीन हलसंगी, शाम बाबर, नीगप्पा निंबाळ, चीतानंद धोडमनी अस्लम मुल्ला , गौतम कसबे, निर्भया पथकाचे सन्ना मीयावाले,ज्योती गाजरे, शेख साहेब कुलकर्णी एन डी, मठपती एम पी, वाघमोडे एस सी, नडगेरी व्ही आय. कुरे एस डी, धड्डे के एम,पुजारी व्ही जे प्रशालेचे कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख शेळके आर.बी यांनी केले आभार संस्थेचे अध्यक्ष कमलाकर सोनकांबळे यांनी मानले

## नियमांचे पालन करुन गणेशत्सोव आनंदात व उत्साहात साजरा करावा

### उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले





**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर शहर व तालुक्यात सर्वच समाजाचे सण, उत्सव एकत्र येऊन आनंदाने साजरे करतात व जातीय सलोखा अबाधित ठेवतात अशी या तालुक्याची परंपरा आहे. आणि हीच परंपरा कायम ठेवून तसेच नियमांचे पालन करु गणेशोत्सव आनंदात व उत्साहात करावा, असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांनी केले. पंढरपूर शहर पोलीस स्टेशन येथे गणेश उत्सवाच्या पार्श्र्वभूमीवर पंढरपूर शहरातील गणेशोत्सव मंडळाची बैठक घेण्यात आली या बैठकीस पोलीस निरीक्षक विश्र्वजीत घोडके, गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी भोसले म्हणाले, गणेशोत्सव काळात शांततेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.कायदा व सुव्यवस्था राखण्याबरोबरच प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे. पारंपरिक वाद्य व कमी आवाजाची साऊंड सिस्टिम याला । पान २ वर



## कडबगाचे तंटामुक्त अध्यक्षपदी गणपती सुतार याची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः कडबगाव ग्रामपंचाय कार्यालय येथे ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते.या सभेत नूतन तंटामुक्त अध्यक्षपदी गणपती सुतार याची एकमताने निवड करण्यात आले.संजय गांधी निराधार कमिटीचे अध्यक्ष महिबुब मुल्ला,सरपंच नसीमा मुल्ला, ग्रा.पं. सदस्य शिवलीला पाटील,सोसायटी चेयरमन मल्लिनाथ पाटील,विजयकुमार पाटील,जाफर मुल्ला,महेश पाटील,हणमंत कापसे,ग्रामविकास अधिकारी खोबण,गजानंद उडचान,महादेव बडूरे, मलकप्पा सुतार, भिमाशंकर तोरणागी,श्रीमंत व्हसुरे, शिवानंद वाडे,शिवण्णा निंबाळकर,शंकर निंबाळकर, तिप्पण्णा लोहार, श्रीशैल माळी,इरण्णा मलशट्टी, गुरुराज हिरेमठ ,शरणप्पा शंकरशेट्टी,विद्यानंद हिरेमठ,कुमार हिरेमठ दत्ता सुतार,अयुब शेख कर्मचारी वर्ग आदी उपस्थित होते.

# राजधानीतील सेंट्रल विस्टा येथे महाराष्ट्र फूड स्टॉलचे उद्घाटन, पारंपारिक महाराष्ट्रीय खाद्यपदार्थांची चव दिल्लीकरांना अनुभवता येणार !

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशाच्या राजधानीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या सेंट्रल विस्टा येथे महाराष्ट्राचा फूड स्टॉल कायमस्वरूपी उभारण्यात आलेला आहे. या स्टॉलचे उद्घाटन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. मनोजकुमार सूर्यवंशी यांच्या हस्ते आज झाले.दिल्लीतील इंडिया गेट जवळ असलेल्या नॉर्थ फूड कोर्टमध्ये हा महाराष्ट्रीय खाद्यपदार्थ देणारा स्टॉल सुरू करण्यात आला आहे. या स्टॉलद्वारे दिल्लीला भेट देणाऱ्या पर्यटकांना महाराष्ट्राच्या समृद्ध खाद्य संस्कृतीची ओळख करून देणे, या उपक्रमाचा उद्देश आहे. सध्या सेंट्रल विस्टा येथे देशातील १६ राज्यांचे फूड स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. यामध्ये साऊथ साईड आणि नॉर्थ साईड अशा दोन्ही बाजूंना प्रत्येकी आठ-आठ स्टॉल्स आहेत. महाराष्ट्राचा फुड स्टॉल नॉर्थ बाजूने आठ क्रमांकाच्या दालनात उभारण्यात आलेला




आहे.महाराष्ट्र फूड स्टॉलवरून दिल्लीकर विविध पारंपारिक महाराष्ट्रीय खाद्यपदार्थांचा आस्वाद घेऊ शकतील. या स्टॉलचे संचालन श्रीनिवास हॉस्पिटॅलिटी अँड मॅनेजमेंट सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड करणार आहे.या स्टॉलच्या उद्घाटनाने महाराष्ट्राच्या पर्यटन विकासाला मोठी चालना मिळणार आहे. दिल्लीला भेट देणारे पर्यटक या स्टॉलवरून महाराष्ट्रीय खाद्यपदार्थांचा आस्वाद घेऊ शकतील.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. मनोजकुमार सूर्यवंशी यांनी यावेळी बोलताना सांगितले की, महाराष्ट्राची खाद्य संस्कृती जगभर पोहोचवण्याचे आमचे स्वप्न आहे. या दिशेने हे स्टॉल एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.सेंट्रल विस्टा येथे सर्व राज्यांचे फूड स्टॉल्स उभे करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वप्न साकार करण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकण्यात आले आहे. यामुळे देशाच्या एकतेची भावना वृद्धिंगत होईल आणि विविध राज्यांची संस्कृतींची देवाण-घेवाण होण्यास मदत होईल.महाराष्ट्राचा फूड स्टॉल दिल्लीतील सेंट्रल विस्टा येथे उभा राहणे ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब असून, खाद्य संस्कृती जगभर पोहोचेल आणि राज्याच्या पर्यटन विकासालाही नवी दिशा मिळेल. दिल्लीकरांना आता पारंपारिक महाराष्ट्रीय खाद्यपदार्थांची चव त्यांच्या सोईनुसार अनुभवता येणार आहे.

## संपादकीय

### माणसांचे भविष्य ठरविते..

विज्ञानावर असलेल्या लोकांच्या विश्वासाचा गैरफायदा घेत भ्रामक विज्ञान लोकांची फसवणूक करत असते. लोकांच्या आरोग्याशी, भावनांशी खेळतानाच आर्थिक शोषणही केले जाते. म्हणूनच फसव्या विज्ञानाचे हे सोंग ओळखणे आवश्यक आहे. मात्र, यासाठी पारखणे, पडताळणी करणे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे गरजेचे आहे. फसवे विज्ञान हे खऱ्या विज्ञानाचे एक सोंग असते. त्याला 'फसवे विज्ञान' वा 'भ्रामक विज्ञान' असेही म्हणता येईल. या भ्रामक विज्ञानाचे एक उदाहरण प्रसिध्द आहे. २००० साली चेन्नई येथील रामन पिल्लई नावाच्या व्यक्तीने आपण शास्त्रज्ञ असल्याचा आव आणून आपल्याला पाण्यापासून डिझेल बनविण्याची एक पध्दत अवगत आहे, असा दावा केला होता. आय. आय.टी. मधील तज्ज्ञांनी केलेल्या चाचणीत त्याची फसवाफसवी उघडकीस आली. पाणी ढवळण्यासाठी पिल्लई जो दांडा वापरत होता तो पोकळ होता. त्यात थोडे डिझेल आधीच भरून घेऊन तो ते अलगद पाण्यात मिसळत असे. पुढे सीबीआयने त्याची चौकशी केली आणि आपण फसवाफसवी करीत असल्याचे त्याने कबूल केले. विज्ञानात गृहीतक, अनुमान, प्रयोग, प्रचिती, पुन्हा पुन्हा पडताळणी आणि प्रचिती अशा पायऱ्या असतात. त्यानंतरच निष्कर्ष काढला जातो. नवीन पुरावे मिळाले तर आधीच्या निष्कर्षात योग्य तो बदल केला जातो. त्याच्या मर्यादा मान्य केल्या जातात. स्थापत्यशास्त्राशी नाते सांगणारे फसवे वास्तुशास्त्र सध्या खूपच लोकप्रिय होत आहे. त्यात आग्नेय दिशेला अग्नी म्हणजे शेगडी, चूल असावी तर पश्चिम दिशेला वेस्टपेपर बास्केट असावे म्हणजे घरात समृध्दी नांदेल, असे हास्यास्पद दावे केले जातात. लोक अशा फसव्या छद्म विज्ञानाच्या मागे का जातात, तेही पाहिले पाहिजे. माणूस हा उपजतच एक भावनाशील प्राणी आहे. कशावर तरी श्रध्दा ठेवावी, अशी त्याची मानसिकता असते. प्रश्न विचारणे, खरे-खोटे पारखणे या गोष्टी त्याला शिकवाव्या लागतात. सतराव्या शतकाच्या सुरुवातीला विज्ञानाचा उदय झाल्यावर विविध प्रकारच्या ऊर्जांचा शोध लागला. जेम्स वॅट यांचा वाफेच्या ऊर्जेचा शोध प्रसिध्द आहे. अणू ऊर्जा, सूर्य ऊर्जा, आघातातून निर्माण होणारी ध्वनी ऊर्जा अशा विविध ऊर्जा भौतिक शास्त्रात अभ्यासल्या जातात. या ऊर्जा मोजण्याची शास्त्रीय एकके असतात. जसे ध्वनी ऊर्जा ही डेसिबल्समध्ये तर विद्युत शक्ती वॉटस्‌मध्ये मोजतात. परंतु छद्म विज्ञानामध्ये मंगळ, शनी अशा ग्रह गोलांपासून वैश्विक ऊर्जा निघते आणि ती निवडक माणसांचे भविष्य ठरविते,

पान १ वरुन

### आर्थिक सक्षमीकरणासोबतच..

अंमलबजावणीमुळे महिलांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. या संबंधात कोणत्याही अपप्रचाराला महिलांनी बळी पडू नये. ही योजना भविष्यातही कायम स्वरुपी सुरु राहणार असून लाभाच्या रकमेत वाढ होणार आहे. सर्वसामान्य महिलांसाठी दीड हजार ही रक्कम मोठी आहे. या रकमेतून त्यांना आर्थिक स्वावलंबन मिळण्यास मोठी मदत होणार असून अर्थव्यवस्थेलाही या योजनेमुळे चालना मिळणार आहे, असा विश्र्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

प्रधानमंत्र्यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या लखपती दिदी योजनेत राज्यातील ५० लाखांहून अधिक महिलांना लखपती केले जाईल, असा विश्र्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. सरकार अत्यंत संवेदनशीलतेने निर्णय घेत आहे. तरुणांनाही मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या माध्यमातून लाभ दिला जात आहे. राज्य शासन अत्यंत संवेदनशिलतेने कार्य करीत आहे. शिक्षण शुल्क भरु न शकल्याने आत्महत्या कराव्या लागलेल्या तरुणीची माहिती मिळताच राज्य शासनाने शिक्षण शुल्कात पूर्ण सवलत देण्याच्या निर्णय घेतला. राज्यातील सरकार हे सर्वसामान्य जनतेसाठी देणारे आणि कृतीशीलतेने काम करणारे सरकार आहे. या सरकारने विविध घटकांसाठी योजनांची अंमलबजावणी करतांनाच विकास आणि जनकल्याण याची सुयोग्य सांगड घातली आहे. या साऱ्या योजनांच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्यासमवेत त्यांच्या सुरक्षिततेचाही प्राधान्य दिले आहे. याबाबतच्या दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

महिला बचत गटाच्या माध्यमातून महाराष्ट्राने सर्वाधिक उत्तम काम केल्याचे गौरवोद्गार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी काढले. मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचा एक मोठा प्रयत्न महाराष्ट्रात सुरु केल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्र्यांचे जाहीर कौतुक केले. राज्यातील महिलांमध्ये या योजनेमुळे उर्जा संचारली असून या लाभातून महिलांना आर्थिक स्वावलंबन प्राप्त झाले आहे. यातून त्यांची कार्यक्षमता वाढणार आहे. सामाजिक समतेसोबतच आर्थिक समता प्रस्थापित होण्यास या योजनेची मोठी मदत होणार आहे. शोषित आणि वंचित समुहातील महिलांना यातून जगण्याचा नवा विश्र्वास मिळाल्याचे त्यांनी सांगितले. पंडित दिनदयाल उपाध्याय यांच्या संकल्पनेतील अंत्योदयाचा सामाजिक विचार यानिमित्ताने प्रत्यक्षात येत असल्याबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीतून नवी आश्र्वासकता व विश्र्वास राज्यातील बहिणींना मिळाला आहे. या योजनेला राज्यातील महिलांनी दिलेला अपूर्व प्रतिसाद लक्षात घेवून या योजनेच्या जोडीला आणखी काय देता येईल याचा प्रयत्न शासन करीत आहे. कोणत्याही स्थितीत ही योजना तेवढयाच सक्षमपणे राबवू, असे स्पष्ट प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. राज्य शासनाने विविध योजनांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचा नवा अध्याय सुरु केला आहे. महिला विकसित झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने भारत विकसित होणार नाही, हे लक्षात घेवून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यादृष्टीने विविध योजनांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणावर भर दिला आहे. विशेषत: मुलींच्या शिक्षणासाठी सर्व पातळ्यांवर मदत करुन परिवर्तन घडविले जाईल. इतिहास बदलण्याची शक्ती महिलांमध्ये असते हे लक्षात घेवून त्यांच्या जीवनात विविध योजनांच्या माध्यमातून परिवर्तन घडविण्याचे प्रयत्न केले जातील. त्यांच्या सन्मानाची जोपासना केली जाईल. अशी हमी देतानांच नागपुरच्या विकासासाठी घेतलेल्या विविध निर्णयांचीही श्री. फडणवीस यांनी यावेळी माहिती दिली. नागपूर शहरात झोपडपट्टीवासियांना मालकी हक्काचे पट्टे वाटप करण्याच्या निर्णयाचा त्यांनी विशेषत्वाने उल्लेख केला.

या योजनेसंदर्भात करण्यात आलेल्या अपप्रचाराला आता उत्तर मिळाले असून तिच्या अंमलबजावणी संदर्भात पसरविण्यात आलेली नकारात्मकता अनाठायी असल्याचे सिद्ध झाल्याचे सांगून उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, ही योजना महिलांना आर्थिक स्वावलंबन देणारी असून ही भविष्यातही कायमस्वरुपी राबविण्यात येणार आहे. या योजनेसोबतच सिलेंडर वाटप, मोफत शिक्षण अशा विविध योजनांच्या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरणासाठी सरकार प्रयत्नशील आहे. राज्य सरकार त्यासाठी ७५ हजार कोटी रुपयाचा निधी खर्च करत आहे. महिलांना सबळ, सक्षम, सन्मानीत आणि सुरक्षित करण्याचे काम राज्यातील विद्यमान सरकारकडून करण्यात येत आहे. त्यांच्या सुरक्षिततेसाठी आम्ही सजग आहोत अशा शब्दात त्यांनी आश्र्वस्त केले.

महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी प्रास्ताविकात मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण या योजनेअंतर्गत राज्यातील ठरविलेल्या उद्दिष्टांपैकी जास्तीत-जास्त लाभ वितरीत करण्यात आल्याचे सांगितले. त्रुटींमुळे अर्ज बाद ठरल्यास महिलांना पुन्हा अर्ज करता येईल व कोणतीही महिला लाभापासून वंचित राहणार नाही, असा दिलासा त्यांनी दिला. राज्यात १० हजार महिलांना पिंक-ई रिक्षा वितरीत करण्यात येणार असून यापैकी १ हजार ४०३ रिक्षा नागपुरात वितरीत करण्यात येणार आहे.

यामुळे महिलांना रोजगार उपलब्ध होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. येत्या नवरात्रोत्सवात अंगणवाडी सेविकांना विशेष लाभ देण्याचा मनोदयही त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमादरम्यान मंचाच्या मध्यभागी तयार करण्यात आलेल्या खास डिजीटल यंत्राची कळ दाबून मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी राज्यातील ५२ लाख महिलांच्या बँक खात्यात 'मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण' योजनेच्या दुसऱ्या टप्प्याच्या लाभाचे थेट वितरण केले. या योजनेअंतर्गत राज्यातील अडीच कोटी महिलांना आर्थिक लाभ देण्याचे उद्दिष्ट असून आतापर्यंत १ कोटी ६० लाख महिलांना लाभ देण्यात आला आहे. ५० हजार महिलांचे अर्ज त्रुटींमुळे बाद ठरले असून या महिलांना पुन्हा अर्ज करता येईल व कोणतीही महिला लाभापासून वंचित राहणार नाही, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेच्या प्रातिनिधीक दहा लाभार्थ्यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते व उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत धनादेश वितरीत करण्यात आले. यासोबतच मुख्यमंत्री वयोश्री योजना, मुख्यमंत्री तिर्थक्षेत्र दर्शन योजना, मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजनेच्या प्रातिनिधीक लाभही वितरीत करण्यात आला.

### अल्पवयीन मुलीचा विनयभंग करून

ऋषिकेश संजय गायकवाड, गणेश संजय गायकवाड, हर्षद हनूमंत धुमाळ, प्रणव गणेश कुंभार, व अनिकेत राजेंद्र कुंभार (सर्व रा. मदनवाडी ता. इंदापूर ) या सर्व आरोपींवरती भिगवन पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या आरोपींमधून एका आरोपीला अटक करण्यात आले आहे. बाकीचे नऊ जण फरार आहे. सदरील घटना बुधवारी (दि.२१) रोजी घडली आहे. वरील सर्व १० आरोपींवर पोस्को व इतर कलमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याबाबत भिगवण पोलीस ठाण्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, अल्पवयीन मुलगी दुपारी घरी एकटी असताना तिने प्रेमाला नकार दिला म्हणून आरोपी रोहन बाळासो गायकवाड व अमित पदमसिंह देवकाते हे दोघे फिर्यादीची चुलत बहिन हिचे कपडे फाडून तिला म्हणाले कि, आम्हाला तू खूप आवडते असे म्हणुन तिच्या मनास लज्जा उत्पन होईल असे वर्तन करून तिचा विनयभंग केला. तसेच वरील सर्व आरोपींनी बेकायदा जमाव जमवून अतुल देवकाते याने फिर्यादीस धरून, धिरज देवकाते याने लोखंडी रॉड व विटेने फिर्यादीच्या डोक्याच्या मागच्या बाजूस मारून गंभीर दुखापत केली आहे.

या सर्व आरोपींनी फिर्यादीस खाली पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व शिवीगाळ, दमदाटी केली तसेच अतुल देवकाते याने फिर्यादीस तु जर माझ्या विरुद्ध पोलीस स्टेशनला तक्रार केली तर तुझ्या डोक्याला रिव्हॉल्व्हर लावून गोळ्या घालून मारीन. अशी धमकी दिली. सदरील घटनेचा तपास भिगवण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद महांगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अमित पाटील करीत आहेत.

### प्रत्येक नागरिकांनी आपल्या दैनंदिन

उपयुक्त ठरतात. प्रत्येक रानभाजीचे एक गुणधर्म आहे. तसेच तृण्य धान्य ही आरोग्यास पोषक आहेत. जागतिक पटलावर ही तृणधान्य चे महत्व आधोरेखित झाले आहे. त्यामुळे हा महोत्सव रानभाजी व मिलेटचा प्रचार व प्रसार करण्यासाठी आवश्यक आहे. तरी जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकांनी या महोत्सवाच्या माध्यमातून रान भाजी व मिलेटचे महत्व लक्षात घेऊन आपल्या रोजच्या आहारात बदल करावा. व आपले आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी स्वतः पुढाकार घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

आत्मा संचालक श्री. किरनळी यांनी ही रान भाज्यांचे महत्व विशद करून नागरिकांनी महोत्सवाला भेट देण्याचे आवाहन केले. तर जिल्हा कृषी अधीक्षक श्री. गावसाने यांनी प्रास्ताविक केले. मानवी जीवनात अन्नाला महत्व आहे. त्यात ही रानभाज्या विशेष महत्वपूर्ण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. म्हणून राज्य शासन मागील आठ वर्षापासून हा महोत्सव आयोजित करून लोकांमध्ये जनजागृती करत असल्याचे त्यांनी सांगितले. प्रारंभी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते फीत कापून या महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी या महोत्सवातील प्रत्येक स्टॉलला भेट देऊन रानभाज्यांचे महत्त्व आपल्या आरोग्यामध्ये किती महत्त्वाचे आहे हे जाणून घेतले. तसेच (मिलेट) तृणधान्यापासून बनवण्यात आलेल्या खाद्यपदार्थांच्या स्टॉलला भेट देऊन काही पदार्थांचा आस्वादही घेतला. तसेच रान भाज्या तसेच तृण धान्य उत्पादन घेणाऱ्या शेतकरी व महिला बचत गटांचे विशेष कौतुक त्यांनी केले. तसेच यावेळी कृषी विभागाच्या पुस्तिकेचे ही प्रकाशन झाले.

*उत्कृष्ट शेतकऱ्यांचा सन्मान : प्रत्येक तालुक्यातील एक शेतकऱ्यांचा येथे सन्मान करण्यात आला. यामध्ये प्रणव बिराजदार निंबर्गी, विलास टेकाळे पापरी (मोहोळ), वासुदेव गायकवाड चळेगाव, सत्यवान लेंगरे आंधळगाव ( अपंग शेतकरी ), राहुल काळे नातेपुते, महेंद्र देशमुख कुंभारगाव. तसेच तृणधान्यापासून तयार करण्यात आलेल्या खाद्यपदार्थ महिलाबचत गटांचा प्रातिनिधिक सत्कार करण्यात आला. यामध्ये विद्या मेहता, अनुराधा बनसोडे, रेखा हजारे, सुरेखा होटगीकर, बबीता जाधव, वंदना अवताडे या महिलांचा प्रशिस्तीपत्रक देऊन सन्मान करण्यात आला. तर या खाद्यपदार्थांचे पर्यवेक्षण करण्याचे काम नीलिमा हरसंगमा, अनिता शेळके, दिनेश क्षीरसागर यांनी पर्यवेक्षक म्हणून काम पाहिले. या महोत्सवास शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर महोत्सवास उपस्थित मान्यवरांचे तसेच उपस्थित शेतकऱ्यांचे आभार प्रकल्प संचालक मदन मुकणे यांनी मानले.

### नियमांचे पालन करुन गणेशत्सोव

मंडळांनी प्राधान्य द्यावे. गणेश मंडळांचा मंडप व विसर्जन मिरवणुकीतील देखावा हा रहदारीस अडथळा करणारा नसावा, ध्वनिक्षेपकाच्या आवाजाची मर्यादा पाळावी, तसेच गणेशोत्सवामध्ये गणेश मंडळांनी पर्यावरणपूरक उपक्रम राबवावेत. समाज प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे सादरीकरण करावे. उत्सव काळात अनुचित प्रकार टाळण्यासाठी मंडळांनी सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करावेत. उत्सव साजरा करताना त्यामध्ये अडचणी निर्माण करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी पोलीस निरीक्षक विश्र्वजीत घोडके म्हणाले,मागील वर्षीप्रमाणे यंदाही शांततेत व चांगल्या वातावरणात उत्सव साजरे करा.समाज माध्यमातून जे आक्षेपार्ह संदेश पाठविण्यात येतात, ते इतरत्र पाठवू नये.आक्षेपार्ह संदेश असेल तर तात्काळ पोलीस स्टेशनला त्याची माहिती दयावी म्हणजे संबंधितावर कारवाई करता येईल.पोलिसांच्या सोशल मीडिया सेलच्या माध्यमातून आक्षेपार्ह सोशल मीडियाच्या पोस्टवर लक्ष ठेवण्यात येत आहे.महीलांच्या सुरक्षिततेसाठी पोलिस प्रशासन तत्पर असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

### हरियाणा विधानसभा निवडणुकीबाबत

आयोगाने तारखांमध्ये बदल जाहीर केला आहे.

निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले की, मतदारांचा मतदानाचा अधिकार अबाधित ठेवणे आणि शेकडो वर्ष जुन्या परंपरेचा सन्मान करण्यासाठी आम्ही निवडणूक पुढे ढकलत आहोत. बिश्र्नोई समाजाचे गुरू जांभेश्र्वर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ३०० वर्षांपासून ही परंपरा समाजाकडून जोपासली जात आहे. दरम्यान जम्मू आणि काश्मीरमध्ये मात्र तीन टप्प्यात निवडणूक होणार आहे. १८ सप्टेंबर रोजी पहिला टप्पा, दुसरा टप्पा २५ सप्टेंबर आणि तिसरा टप्पा १ ऑक्टोबर रोजी पार पडेल. तर मतमोजणी हरियाणा राज्याबरोबरच ८ ऑक्टोबर रोजी केली जाईल.हरियाणात विधानसभेच्या ९० जागांसाठी निवडणूक होणार आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला हरियाणात फटका बसला होता. २०१९ साली त्यांना हरियाणात १० जागा मिळाल्या होत्या. यावेळी त्यांना फक्त पाच जागा जिंकण्यात यश मिळाले. हरियाणामध्ये बिश्र्नोई समाजाची संख्या बऱ्यापैकी आहे. बिश्र्नोई समाजाचे मूळ हे शेजारच्या राजस्थान राज्यात असले तरी गेल्या काही वर्षांत अनेकजण हरियाणामध्येही स्थायिक झाले आहेत. त्यामुळे या समाजाच्या मतावर सर्वच पक्षांचा डोळा आहे.

### मान्सूनच्या परतीच्या प्रवासाला विलंब होणार : हवामान विभाग

पुणे : यंदा ऑगस्ट संपत आला तरी अनेक भागात मुसळधार पाऊस पडत आहे. आधी केरळ, कर्नाटक, महाराष्ट्र, दिल्लीमध्ये पुराचा कहर केल्यानंतर आता गुजरात, राजस्थानमध्ये पावसाने हाहाकार माजविलेला आहे. काही केल्या हा पाऊस थांबण्याचे नावच घेत नाही. अशातच आता पाऊस सप्टेंबर नाही तर पार ऑक्टोबरपर्यंत पडतच राहणार असल्याचे संकेत मिळत आहेत. हवामान विभागाच्या तज्ञांनुसार कमी दाबाचा पट्टा बनला आहे. यामुळे मान्सूनच्या परतीच्या प्रवासाला विलंब होणार असून यामुळे शेतीचे नुकसान होणार आहे. मान्सून परतण्यास सप्टेंबरअखेर किंवा त्यापेक्षाही पुढे सुरुवात होऊ शकते. भात, कापूस, सोयाबीन, मका, डाळी आदींचे उत्पादन सप्टेंबरअखेर घेतले जाते. यामुळे जर ऑक्टोबरमध्ये पाऊस झाला तर शेतीचे मोठे नुकसान होणार असल्याचा अंदाज आहे. पुढील पीक थंडीत पेरले गेले तर त्याचा फायदा पिकाला होणार आहे. कारण जमिनीमध्ये ओलावा राहणार असून गहू, हरभरासारख्या पिकाला याचा फायदा होणार आहे. हवामान विभागाच्या एका वरिष्ठ संशोधकाने ही माहिती दिली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# अनंत चैतन्य प्रशालेत किशोरवयीन मुलींसाठी आरोग्यविषयक कार्यशाळा संपन्न

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधीः मुलींचे बालपण संपून तारुण्य सुरू होईपर्यंतच्या संक्रमण कालावधीला सामान्यपणे पौगंडावस्था म्हणतात. किशोरावस्था किंवा कुमारावस्था म्हणून ओळखला जाणारा हा काळ वयाच्या १० ते १८ वर्षादरम्यानचा असतो.वयात येत असताना मुलींच्या जीवनातील हा काळ त्यांच्या भावी जीवनासाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. असे प्रतिपादन आज महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय, हन्नूर येथे आयोजित एकदिवसीय आरोग्यविषयक कार्यशाळेत प्राथमिक आरोग्य केंद्र, चप्पळगावच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवलिला माळी यांनी केले. किशोरवयीन मुलींच्या समस्या व उपाय या विषयावर त्या बोलत होत्या. तर निरोगी व निकोप वाढीसाठी किशोरवयीन मुलींनी आरोग्य, आहार व स्वच्छतेबाबत विशेष दक्षता घ्यावी असे मत ग्रामीण रुग्णालय अक्कलकोट च्या वैद्यकीय अधिकारी डॉ.शिफा बागवान यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना या कार्यशाळेतून व्यक्त केल्या.



किशोरवयात शारीरिक व बौद्धिक वाढ होऊन सामाजिक जाणिवा दृढ होत असतात. मुलींना सकारात्मक आधार देऊन याबाबतचे शिक्षण देण्यासंबंधी व त्यांच्या विविध समस्यांवर समुपदेशन करणे अत्यंत गरजेचे असते हे लक्षात घेऊन संस्थेच्या संचालिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी यांच्या निर्देशानुसार सदर कार्यशाळेचे प्रशालेचे मुख्याध्यापक अशोक साखरे यांनी आयोजन केले होते.

या कार्यशाळेत सातवी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेच्या जेष्ठ शिक्षिका सौ. मृदुलादेवी स्वामी होत्या.यावेळी ग्रामीण रुग्णालय च्या आरोग्यसेविका सौ. विजयालक्ष्मी कोरे , हन्नूर प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या आरोग्यसेविका सौ. मंजुळा जाधव, आशावर्कर्स सौ. मायव्वा घोडके,मनिषा बाळशंकर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन सौ. मल्लम्मा चप्पळगाव यांनी केले तर आभार सौ. स्वप्नाली जमदाडे यांनी मानले. आजच्या या प्रशालेच्यावतीने आयोजित महत्वपूर्ण उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व आमदार मा. सचिनदादा कल्याणशेट्टी,संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक आदरणीय मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारवड सन्माननीय श्री. सिद्धेश्र्वर कल्याणशेट्टी, हन्नूर चे उपसरपंच व युवा नेते मा. सागर कल्याणशेट्टी, संचालक श्री. मल्लिकार्जुन मसुती, सी. ई. ओ. सौ. रुपाली शहा, ज्युनियर विभाग प्रमुख सौ. पुनम कोकळगी यांनी समाधान व्यक्त केले.

# आ.समाधान आवताडे यांचे लाडक्या बहिणींसाठी रक्षाबंधन सोहळ्याचे आयोजन

## पंढरपूर तालुक्यातील २२ गावातील महिलांसाठी कासेगाव आणि लक्ष्मी टाकळी गावात रक्षाबंधन सोहळा

**बहीण भावाच्या नात्याला दृढ करणारा हा रक्षाबंधन सोहळा असून यानिमित्ताने माता भगिनिंशी हितगुज करण्याचा प्रयत्न आहे. माता भगिनीचा आशीर्वाद मिळाल्यामुळे आमदार म्हणून काम करण्याची संधी मिळाली आहे. त्यामुळे माता भगिनिशी संवाद साधण्याचा हेतू आहे, माता भगिनींना आवाहन आहे की त्यांनी मोठ्या संख्येने या सोहळ्यास उपस्थित राहून आशीर्वाद द्यावेत.–आ. समाधान आवताडे**

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधीः श्रावण महिना आणि रक्षाबंधनाच्या निमित्ताने लाडक्या बहिणींना भेटण्याचे, त्यांच्याशी हितगुज करण्याचे नियोजन आ. समाधान आवताडे यांनी केले आहे. पंढरपूर शहर आणि ग्रामीण भागातील महिलांसाठी हळदी कुंकू, रक्षाबंधन, स्नेह भोजन असे नियोजन केले आहे. आज ( रविवार दि १ सप्टें ) लक्ष्मी टाकळी आणि कासेगाव येथे रक्षाबंधन सोहळ्याचे आयोजन करण्यात आलें आहे.



सध्या श्रावण महिना सुरू आहे, नुकताच रक्षाबंधन सण संपन्न झालेला आहे. या पार्श्र्वभूमीवर आ. समाधान आवताडे यांच्यावतीने पंढरपूर – मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातील माता, भगिनींसाठी रक्षाबंधन, हळदी कुंकू समारंभ आणि यानिमित्ताने स्नेह भोजन अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी आ.समाधान आवताडे स्वतः उपस्थित राहून महिलांशी संवाद साधून त्यांच्या शासकीय पातळीवरील योजना, त्यांचा लाभ घेण्यासाठी अडचणी सोडवण्यासाठी मार्गदर्शन करणार आहेत.

**१) दि. १ सप्टेंबर रोजी** रांजणी, मुंढेवाडी, अनवली, गोपाळपूर, एकलासपुर, सिद्धेवाडी, तावशी, तनाळी, खर्डी, तपकिरी शेटफळ, कासेगाव, चीचुंबे, शिरगाव, तरटगाव या गावातील महिलांसाठी स्थळ : कासेगाव येथील यल्लंमा मंदिर परिसर

२) वाखरी, गादेगाव, कौठाली, शिरढोण, कोर्टी, बोहाळी, उंबरगाव, लक्ष्मी टाकळी या गावातील महिलांसाठी स्थळ – लक्ष्मी टाकळी बायपास येथील प्रथमेश मंगल कार्यालय

**२) दिनांक ३ सप्टेंबर रोजी** पंढरपूर शहर, उपनगर आणि इसबावी भागातील महीलासाठी श्रीराम मंगल कार्यालय, इसबावी, संत मीराबाई मठ, कैकाडी महाराज मठाजवळ, पंढरपूर, शनेश्र्वर मंगल कार्यालय, सांगोला रोड, पंढरपूर येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.

# स्वेरीच्या पाच विद्यार्थ्यांची ‘ॲक्का चिल सिस्टम्स प्रा.लि.’ या नामांकित कंपनीत निवड

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधीः ‘ॲक्का चिल सिस्टम्स प्रायव्हेट लिमिटेड’ या नामांकित कंपनीने घेतलेल्या मुलाखतीत गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग व इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग या विभागांतील पाच विद्यार्थ्यांची कॅम्पस ड्राईव्ह मधून निवड करण्यात आली आहे.’ अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली.




‘ॲक्का चिल सिस्टम्स प्रायव्हेट लिमिटेड’ या नामांकित कंपनीच्या निवड समितीने निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून स्वेरीच्या जगदीश भीमाशंकर हनमावाले, विराज वसंत शेटे, नागेश भास्कर गाजरे, प्रथमेश नागेश साळुंखे व विशाल पंपू ढगे या पाच विद्यार्थ्यांची निवड केली ‘ॲक्का चिल सिस्टम्स प्रायव्हेट लिमिटेड’ ही कंपनी २७ वर्षे जुनी असून १९९७ साली स्थापन झाली आहे. ही कंपनी प्रामुख्याने एचव्हीएसी या क्षेत्रात कार्यरत आहे. लवकरच ही कंपनी एक हजार कोटी टर्न ओव्हरचे ध्येय गाठणार आहे. एचव्हीएसी हे एक विशेष कार्यक्षेत्र आहे, त्याचा उपयोग फार्मसी, दवाखाने, मेकॅनिकल आणि इतर बऱ्याच विभागात होतो. यामुळे विद्यार्थ्यांना अशा विविध क्षेत्रात काम करण्याची संधी मिळणार आहे. स्वेरी अभियांत्रिकीमध्ये विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्या प्लेसमेंटसाठी येत असतात आणि कंपनीसाठी पात्र अशा विद्यार्थ्यांची निवड करत असतात. त्यामुळे विविध आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये येथील विद्यार्थी आपले उत्तम करिअर घडवीत आहेत. या विद्यार्थ्यांना स्वेरीमध्ये विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. सदर विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट मधील व विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्र्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, अभियांत्रिकी पदवीच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यासह पालकांनी कॅम्पस इंटरव्युवमधून ‘ॲक्का चिल सिस्टम्स प्रायव्हेट लिमिटेड’ या कंपनीत निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.आण्णाभाऊ साठे समाजभुषण पुरस्कारसाठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

बुलढाणा/राहुल साबळेः मेहकर–तथागत बहुउद्देशीय संस्था, मेहकर (रजि. नं. महा. ७९ / २०२० एफ १८६५४) बुलढाणा द्वारा आयोजित तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य सामाजिक संघटना (ऑल इंडीया कार्यरत), राजमाता माँ.जिजाऊ महिला स्वयंमसहाय्यता बचत गट यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्यातील कानाकोपऱ्या मधुन प्रत्येक जिल्ह्यातील कर्तृत्ववान पुरुषांचा व महिलांचा साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.आण्णाभाऊ साठे समाजभूषण पुरस्कार देवून सन्मान करण्यात येणार असल्याची घोषणा तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिप गवई यांनी केली आहे. आपला प्रस्ताव पाठविण्याची अंतिम तारीख ३०/सप्टेंबर २०२४ आशी आहे. महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यामधुन सामाजिक, शैक्षणिक, शिक्षक, सांस्कृतिक,

कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकिय, प्रशासकीय, पत्रकारिता,(वृत्तपत्र इलेक्ट्रोनिक / डिजिटल मीडीया) युवक। महिला । कला । साहित्य । क्रीडा । पर्यावरण । ग्रामविकास ।आशा विविध क्षेत्रामध्ये चांगले कार्य करणार्या पुरषांना व महिलांना तसेच युवक, युवतीना प्रोत्साहन देण्याच्या उपदेशाने हा पुरस्कार सोहळा राबविण्यात येणार आहे. मेहकर येथे साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.आण्णाभाऊ साठे समाजभूषण पुरस्कार या ुरस्कारांचे गावपातळीवर वितरण होणार आहे यामध्ये सन्मानपत्र, सन्मानचिन्ह,पंचरंगीदुपट्टा,महामानवांच्या विचारातील एक सुंदर पुस्तक असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यासाठी इच्छुक सामाजिक, शैक्षणिक, शिक्षक, सांस्कृतिक,कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकिय, प्रशासकीय, पत्रकारिता,(वृत्तपत्र इलेक्ट्रोनिक / डिजिटल मीडीया) युवक। महिला । कला । साहित्य । क्रीडा । पर्यावरण । ग्रामविकास ।आशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. आशा गुणीजनांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण व जेष्ठ नागरिक, माजी सैनिक यांचा भव्य नागरी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. तरी इच्छुकांनी आपला प्रस्ताव तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिपभाऊ गवई तथागत ग्रुप संपर्क कार्यालय– मिलिंद नगर वार्ड नं १९ मेहकर ता. मेहकर जिल्हा बुलढाणा येथे यांच्याकडे सादर करावा. किंवा खाली दिलेल्या व्हॉटसप मोबाईल क्रमाकांवर ९९७०४६७१४१ पाठवून द्यावा व संपर्क साधावा. त्या अनुषंगाने सामाजिक कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान सामाजिक क्षेत्रातील पुरुष, महिलांनी तसेच युवक युवतीनी आपला कार्य अहवाल पाठवावा. तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संदिपभाऊ गवई यांच्याकडे सादर करण्याचे आव्हान यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांची अभ्यास भेट



**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

नळदुर्ग/एस.के.गायकवाड : कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय नळदुर्ग येथे टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स येथील राज्यशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय नळदुर्ग येथील राज्यशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांची अभ्यास भेट घेतली. या कार्यक्रमांमध्ये टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स येथील डॉ. आशिष नवनीत यांनी अभ्यास भेटीच्या पाठीमागचा उद्देश विद्यार्थ्यांना सांगितला. त्यानंतर डॉ.निलेश शेरे यांनी अशा अभ्यास भेटी मधून विचारांची देवाण-घेवाण होते आणि यातूनच विद्यार्थी प्रगल्भ होतो. तसेच या अभ्यास गटामध्ये उत्तर प्रदेश, पश्र्िचम बंगाल, राजस्थान दिल्ली, केरळ या राज्यातील विद्यार्थ्यांशी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना वैचारिक संवाद करता आला त्यामुळे निश्र्िचतच याचा फायदा आपल्या विद्यार्थ्यांना होईल असे मत व्यक्त केले. यानंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांबरोबर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले व विद्यार्थ्यांनी विविध विषयावर चर्चा केली.

महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. सुभाष राठोड सर यांनी अभ्यास गटाचे प्रमुख डॉ. आशिष नवनीत व त्यांच्यासोबत आलेले सर्व विद्यार्थी यांचा सत्कार केला. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. बालाजी क्षिरसागर, प्रा. राजेंद्र म्हमाने, श्री रमेश सर्जे यांनी परिश्रम घेतले.




# श्री रुक्मिणी विद्यापीठाचा वर्धापन दिन साजरा

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी :श्री रुक्मिणी विद्यापीठाच्या ३२ व्या वर्धापन दिनानिमित्त श्री माताजी निर्मला देवी प्राथमिक उच्च माध्यमिक विद्यामंदिर पंढरपूर शाळेत उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर आरबीएस के टीम डॉक्टर आबासाहेब गायकवाड व त्यांच्या सहकार्यामार्फत विद्यार्थ्यांची आरोग्याची तपासणी करण्यात आली त्याचबरोबर डॉक्टर डीजे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक माहिती सांगितली संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त विद्यार्थ्यांची रंगभरण स्पर्धा घेण्यात आली रंगभरण स्पर्धेमध्ये सर्व विद्यार्थ्यांनी छान चित्र रंगवली विद्यार्थ्यांच्या रंगवलेल्या चित्राचे प्रदर्शन भरवण्यात आले अशा प्रकारे उत्साही वातावरणात संस्थेच्या वर्धापन दिन साजरा करण्यात आला यावेळी मुख्याध्यापक श्री संतोष कवडे सर यांनी संस्थेविषयी माहिती सांगितली असे महेश भोसले यांनी आभार मानले

# दरेगाव तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी बबनराव जायभाये यांची बिनविरोध निवड



**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

बुलढाणा / राहुल साबळे : सिंदखेडराजा तालुक्यातील दरेगाव ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेचे दिं.३०ऑगस्ट रोजी आयोजन करण्यात आले होते.या ग्रमसभेमध्ये अध्यक्षपदासाठी अनेक इच्छुकांची रस्सीखेच सुरू होती . परंतु बबनराव जायभाये नेहमिच तंटे मिटविण्यासाठी अग्रेसर असल्यामुळे. नागरीकांनी . महात्मा गांधी तंटामुक्ती गाव समितीच्या अध्यक्षपदी बबन जायभाये यांची अविरोध निवड करण्यात आली आहे.स्वर्गीय आर आर आबा पाटील गृहमंत्री असताना यांच्या संकल्पनेतून पोलिस प्रशासनाचा ताण कमी व्हावा यासाठी निर्माण झालेल्या गावपातळीवरील समित्यांनी आज पर्यंत छोटे मोठ्या तंट्यांचा गावातच निपटारा करून असे अनेक गावे तंटामुक्त झालेली आहेत.व त्यांना शासनाकडून अश्या गावाला पुरस्कार सुध्दा प्राप्त झालेला आहे.बबनराव जायभाये यांची दरेगाव तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी सलग दुसऱ्यांदा निवड करण्यात आली आहे.निवडी नंतर ग्रामपंचायत कडून सत्कार करण्यात आला यावेळी दरेगाव सरपंच पती रवि मांटे.ग्रामपंचायत सचिव एन.बी इंगळे .शेतकरी संघटनेचे आत्माराम गाडे.स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे आत्माराम बंगाळे . माजी सरपंच विठोबा मांटे.माजी सैनीक प्रकाश काळुसे.माजी सरपंच अविदास बंगाळे.गणेश भा. बंगाळे अशोक जायभाये असंख्य नागरिक उपस्थित होते.

# माढ्याची २०२४ची दहीहंडी आपणच फोडणार अभिजीत पाटलांचं मोठं वक्तव्य

अभिजीत आबा पाटील मित्र परिवार माढा यांच्या वतीने माढा येथे आयोजन करण्यात आले ✻ प्रमुख आकर्षण म्हणून सिनेअभिनेत्री अक्षया देवधर यांची प्रमुख उपस्थिती ✻ शिवशाही प्रतिष्ठान,माढा हा संघ ठरला विजेता



**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

माढा/प्रतिनिधीः श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांच्या वतीने माढा येथे युवाशक्ती दहीहंडी उत्सव ठेवण्यात आलेला होता.


दहीहंडीच्या निमित्ताने कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण म्हणून सिने अभिनेत्री अक्षय देवधर यांची प्रमुख उपस्थिती होती. याच ठिकाणी विठ्ठल कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी आपल्या सर्वांच्या साथीने, सर्वांच्या प्रेमाने व आशीर्वादाच्या जोरावर आपणच येणारी २०२४ची विधानसभेची दहीहंडी फोडणार असल्याचे मोठे वक्तव्य अभिजीत पाटील यांनी केल्याने माढा तालुक्यात चर्चेला उधाण आहे. सध्या गावोगावी अभिजीत पाटील यांची प्रचार यंत्रणा फिरत असून वेगवेगळ्या कार्यक्रमाच्या माध्यमातून अभिजीत पाटील यांनी जनसंपर्क वाढवण्यावर जोर दिला असल्याचे पहावयास मिळत आहे. गेल्या काही दिवसापूर्वी टेंभुर्णी येथे कुस्ती मैदानाच्या आखाड्यात कोणीही उमेदवार असू द्या त्याला चिटपट करायचे माहिती आहे असे वक्तव्य केले होते.माढा युवाशक्ती च्या माध्यमातून झालेल्या दहीहंडीचा शिवशाही प्रतिष्ठान, माढा यांनी बक्षीस पटकावत मानाचा फेटा आणि रोख पारितोषिक वितरण करण्यात आले.

यावेळी उपस्थित धाराशिव साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अमर पाटील राजाभाऊ चवरे, आनंद कानडे, शहाजी साठे, शिवाजी पाटील, ड.धनंजय चव्हाण,शंभू साठे, पंडित साळुंखे, यू एफ जानराव, एड. विजय माने, निशांत पालकर, भाऊसाहेब महाडिक, अजिंक्य चव्हाण,पोपट आलदर, सज्जन पाटील, संदीप उमाटे , अच्युत उमाटे, ऋषिकेश तंबीले, संजय तांबिले, ज्ञानेश्र्वर बगडे, संजय भोगे, शिवाजी मुळे, नागेश इंगळे, दत्तात्रय पाटेकर, दादा नाईक, समाधान पाटील, शंभू चौरे, अमोल देशमुख, सतीश लटके, समाधान नागटिळक, दत्तात्रय पाटेकर, सागर शिंदे, पिंटू आतकरे, अभिजीत उबाळे, सागर बारबोले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजक आबासाहेब साठे, जीतू जमदाडे, अक्षय शिंदे, सुयश मस्के व अभिजीत आबा पाटील मित्र परिवार माढा तालुका यांनी परिश्रम घेतले.

# तहसिल कार्यालयातील विस्थापित टपरीधारकांचे नवीन प्रशासकीय इमारतीच्या आवारात पुनर्वसन करा : रिपाइंची मागणी

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी : पुरंदरचे तहसील कार्यालय नवीन प्रशासकीय इमारतीत स्थलांतरित होत असल्याने , जुन्या तहसिलदार कार्यालयातील अनेक टपरीधारक हे विस्थापित झाले असून, त्यांच्या उपजीविकेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, त्यामुळे नवीन प्रशासकीय इमारतीच्या आवारात संरक्षण भिंतीला लागून सर्व टपरीधारकांचे पुनर्वसन करण्यात यावे अशी मागणी, पुरंदर तालुक्याचे तहसिलदार विक्रम राजपूत यांच्याकडे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश सरचिटणीस विष्णूदादा भोसले यांनी निवेदनाद्वारे केली, यावेळी अँड सचिन जाधव, राहुल गायकवाड , राणीताई जाधव, हे उपस्थित होते, पुरंदरचे तहसिलदार मा. विक्रम राजपूत यांना दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, जून्या तहसील कार्यालयासमोर गेले अनेक वर्षे, टपरीधारक धारक, महसूल प्रशासनाशी निगडीत असलेली , प्रतिज्ञापत्र, विविध प्रकारचे दाखले, विविध प्रकारचे दस्त ,करार झेरॉक्स, टायपिंग आदी कामे करुन आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करीत आहेत, परंतु पुरंदरचे तहसील कार्यालय हे नवीन प्रशासकीय इमारतीत स्थलांतरित होत असल्याने , मुळ तहसील कार्यालयाच्या आवारात असलेले सर्व टपरीधारक आज विस्थापित झाले असून, त्यांच्या समोर, त्यांच्या कुटूंबाच्या उपजीवीकेचा गंभीर प्रश्न्न निर्माण झाला आहे, सोमवार दि. २६ ऑगस्ट रोजी नवीन प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन राज्याचे उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार अजितदादा पवार यांच्या शुभहस्ते व विविध मान्यंवर व



प्रशासकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत संपन्न झाला आहे, यावेळी बोलताना नामदार अजितदादा पवार यांनी, काही मार्गदर्शक सूचना केल्या आहेत, यामध्ये प्रशासकीय इमारतीत असलेल्या प्रशासकीय कार्यालयाशी निगडित असलेल्या झेरॉक्स टायपिंग आदी कामकाजासाठी प्रशासनाने गाळे द्यावेत याबाबत काही मार्गदर्शक सूचना केल्या आहेत, त्यानुसार मुळ तहसील कार्यालयातील विस्थापित सर्व टपरीधारकांना बी. ओ. टी. तत्वावर एकसारखे गाळे बांधून ते भाडे तत्वावर दिल्यास , किंवा बांधा वापरा व भाडे द्या या तत्वावर विस्थापित टपरीधारकांना गाळे प्रशासनाने दिल्यास विस्थापित टपरीधारकांच्या कुटूंबाचा उपजीवीकेचा प्रश्न्न कायमचा मिटून शासनाला देखील भाडे मिळेल व इमारतीच्या देखभाल दुरुस्ती व इतर खर्च त्यातून प्रशासनाला करता येईल त्यामुळे प्रशासनाने, प्रशासकीय इमारतीच्या दक्षिण व पश्र्चिम बाजूस इमारतीच्या आवारात संरक्षण भिंतीला लागून, गाळे बांधल्यास टपरीधारकांना न्याय मिळेल व त्यांच्या कुटूंबाच्या उपजीवीकेचा प्रश्न्न कायमचा सूटेल, मोजक्याच टपरीधारकांना गाळे दिल्यास इतर सर्व टपरीधारकांवर अन्याय होईल, त्यामुळे एकही टपरीधारक विस्थापित होणार नाही याचा शासनाने व प्रशासनाने सहानुभूती पूर्वक विचार करून, सर्व टपरीधारकांना दुजा भाव न करता गाळे द्यावेत असे ही तहसिलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, असे न झाल्यास विस्थापित टपरीधारकांच्या न्याय हक्कासाठी व त्यांच्या उपजीवीकेचा प्रश्न्न कायमचा सोडविण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेड यांच्या वतीने, टपरीधारकांच्या समवेत बेमुदत उपोषण करण्यात येईल व त्यास प्रशासन जबाबदार राहील असे ही निवेदनात म्हटले आहे, सदर निवेदनावर विस्थापित अनेक टपरीधारकांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत ,

# शिक्षकांनी अध्यापन क्षेत्रातील नवे तंत्रज्ञान आत्मसात करावे

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधीः नव्या-तंत्रज्ञानाचा वापर शैक्षणिक क्षेत्रात वाढविल्यास अध्यापन-अध्ययन प्रक्रिया सुलभ व परिणामकारक होते हे प्रयोगाअंती सिद्ध झाले आहे. नव्या-तंत्रज्ञानाच्या वापराने अध्यापन प्रक्रिया सोपी होण्यास मदत होते. केवळ व्याख्यान पद्धतीचा वापर केल्यास विद्यार्थ्यांना अध्यापनात रुची निर्माण होत नाही. त्यामुळे अध्ययन प्रक्रिया ही रटाळ आणि कंटाळवाणी होते. सध्याची शिक्षण पद्धती ही पाहून शिकण्याची असल्याने शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिक्षण पूरक साधनांचा पुरवठा करावा. असे मत एज्युटेक कॉर्पोरेशन, अहमदनगर येथील श्री. भूषण कुलकर्णी यांनी व्यक्त केले.



येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात महाविद्यालयीन प्राध्यापकासाठी आयोजित 'अध्यापन प्रक्रियते नव-तंत्रज्ञानाचा वापर' या विषयावरील प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री. भूषण कुलकर्णी बोलत होते. त्यांनी प्रथम सत्रामध्ये ओबीएस स्टुडीओचा वापर करून संगणकाच्या मदतीने स्वतःचे लेक्चर रेकोर्ड करण्याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. प्रशिक्षण शिबिराच्या द्वितीय सत्रामध्ये महाविद्यालयातील शिक्षकांनी स्वतःचे लेक्चर रेकोर्ड करून घेतले. तिसऱ्या सत्रामध्ये अध्यापन प्रक्रियेमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर कशा पद्धतीने करावा याचे प्रशिक्षण देण्यात आले. एज्युटेक कॉर्पोरेशन, अहमदनगर येथील एकनाथ कोरे यांनी सर्व तांत्रिक बाबींचे सादरीकरण केले.

या प्रशिक्षण शिबिराच्या उदघाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी बजावणी करताना दूरस्थ शिक्षणासाठी या प्रक्रियेचा व रेकोर्ड केलेल्या लेक्चरचा कशा पद्धतीने वापर करावा यावर मार्गदर्शन केले. प्रशिक्षण शिबिरातून तयार होणारे सर्व लेक्चर लवकरच महाविद्यालयाच्या एल. एम. एस. वर उपलब्ध होतील व विद्यार्थ्यांना ते केंव्हाही वापरता येतील असे सांगितले. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. भगवान नाईकनवरे, प्रा. डॉ. बाळासाहेब बळवंत, प्रा. राजेश कवडे, प्रा. डॉ. तुकाराम अनंतकवळस, नॅक समन्वयक डॉ. अमर कांबळे, नॅक सहसमन्वयक डॉ. समाधान माने, रुसा समन्वयक प्रा. योगेश पाठक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. अमर कांबळे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. समाधान माने यांनी करून दिला. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक बहुसंख्येने उपस्थित होते.

# मलिन्नाथ धुमाळ यांचे दु:खद निधन

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनिधीः वागदरी ता. तुळजापूर येथील प्रगतिशील बागायतदार शेतकरी एक हरहुन्नरी सामाजिक कार्यकर्ते मलिन्नाथ आनंद धुमाळ उर्फ अर्जुन धुमाळ यांचे दि.३० आगस्ट २०२४ रोजी दुपारी ठिक ३.० वा.दरम्यान अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले.मृत्यू समई त्यांचे वय ४५ वर्षे होते.



कै.अर्जुन धुमाळ यांचा धाराशिव, लातूर, सोलापूर, जिल्ह्यातील शेकडो शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात पाणी दाखवून त्यांना बारमाही बागायतदार बनविणारा पाणीदार माणूस म्हणून नावलौकिक होता. ते गेल्या काही दिवसांपासून आजारी होते.मुंबई येथील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाले होते. उपचारा दरम्यान दि.३०/०८/२०२४ रोजी दुपारी ठिक ३.०वा.दरम्यान त्यांची प्राणज्योत मावळली. त्यांच्या पश्र्चात आई, वडील, पत्नी दोन मुले भावंडे असा मोठा परिवार आहे. याप्रसंगी उपस्थित शोकाकुल जनसमुदाय, नातेवाईक युवा कार्यकर्ते, महीला ग्रामस्थांनी कै.मल्लिन्नाथ धुमाळ यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

# राजमाता जिजाऊ फाउंडेशन महिला मुलींच्यावर होत असलेल्या अत्याचार पार्श्वभूमीवर स्वत:चे संरक्षण कसे करावे याबाबत प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

सैनिक टाकळी/संजय चव्हाणः सैनिक टाकळी .तालुका .शिरोळ येथे राजमाता जिजाऊ फाउंडेशन च्या वतीने देशात व राज्यात महिला मुलीवर होत असलेल्या अत्याचाराच्या पार्श्र्वभूमीवर स्वतःचे संरक्षण कसे करावे याबाबत शाळेमधली छडी गायब झाल्यापासून समाजात गुन्हेगारी वाढू लागली आहे. मुलांमध्ये अपमान, बेइज्जती ,शिक्षा यांचे भय राहिले नाही असे मत इयत्ता पाचवीच्या बालभारती पाठ्यपुस्तकातील कठीण समय येत आहे या पाठाचे लेखक मनोहर भोसले यांनी व्यक्त केले .ते सैनिक टाकळी येथील मुलींसाठी आयोजित केलेल्या प्रबोधन कार्यक्रमात बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सैनिक टाकळी गाव कामगार पोलीस सौ सुनीता राजेंद्र पाटील होत्या.

सैनिक टाकळी येथील राजमाता जिजाऊ फाउंडेशनच्या वतीने ग्रामपंचायत सांस्कृतिक भवन मध्ये आयोजित करण्यात आलेले या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून सांगली जिल्हा ग्रामीण पोलीस सहाय्यक उपनिरीक्षक रामदास बागडी होते. यावेळी बोलताना म्हणाले, महिला मुलींनी साहसी होऊन अन्याय अत्याचाराचा विरोध केला पाहिजे. आपल्या बाबतीत किंवा परिसरात घडणाऱ्या चुकीच्या गोष्टींची कल्पना पोलिसांना दिली पाहिजे.यावेळी सैनिक टाकळी येथीलसेवानिवृत्त पोलीस अधिकारी चंद्रकांत जाधव, अमर पाटील, शिवाजी पाटील शशिकांत कदम ,श्री छत्रपती शिवाजी हायस्कूलचे एनसीसी विभाग प्रमुख नयन पाटील, सौ धुमाळे मॅडम,गर्ल्स हायस्कूलच्या मुख्याध्यापिका सौ अंबुबे, रणजीत वासमकर, प्रतीक काटकर, सौ सुवर्णा पाटील,कुमार विद्या मंदिराच्या मुख्याध्यापिका सौ. शोभा बाबर, कन्या विद्या मंदिर व संभाजीनगर येथील जि प शाळेचे अध्यापक तसेच इंग्लिश मीडियम स्कूल चे अध्यापक आदिमसह विद्यार्थिनी ,पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत प्रास्ताविक .सौ संगीता भोसले मॅडम यांनी केले सूत्रसंचलन किरण पाटील . पायल पाटील यांनी केले.

# स्टार प्रवाहचे कलाकार जल्लोषात स्वागत करणार गणरायाचं

## स्टार प्रवाह गणेशोत्सव २०२४ मधून उलगडणार खजिना बाप्पाच्या गोष्टींचा

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

गणपती बाप्पाच्या आगमनासाठी आता अवघे काही दिवस उरले आहेत. भक्तीमय वातावरणाने भारावून टाकणारे हे १० दिवस वर्षभर पुरेल इतकी ऊर्जा आणि नवचैतन्य देऊन जातात. लाडक्या बाप्पाचा हा उत्सव जल्लोषात साजरा करण्यासाठी स्टार प्रवाहचा संपूर्ण परिवार सज्ज आहे. मराठी परंपरा मराठी प्रवाह हे ब्रीदवाक्य सार्थ ठरवणाऱ्या स्टार प्रवाह वाहिनीने प्रेक्षकांच्या अभिरुचीचा मान ठेवत नेहमीच दर्जेदार कलाकृती सादर केल्या आहेत. स्टार प्रवाह परिवार गणेशोत्सव २०२४ या गणपती विशेष कार्यक्रमातून यंदा उलगडणार आहे खजिना बाप्पाच्या गोष्टींचा. कधीही न ऐकलेल्या आणि पाहिलेल्या बाप्पाच्या गोष्टी स्टार प्रवाह गणेशोत्सव २०२४ कार्यक्रमातून नृत्यनाटिकेच्या रुपात आपल्यासमोर उलगडतील. स्टार प्रवाह परिवारातले जवळपास १०० कलाकार आपल्या कलेच्या माध्यमातून गणरायाचा उत्सव साजरा करणार आहेत.

या गणपती विशेष कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी पार पाडलीय थोडं तुझं आणि थोडं माझं मालिकेतील मानसी आणि तेजस म्हणजेच समीर परांजपे आणि शिवानी सुर्वे यांनी. तर सुप्रसिद्ध अभिनेत्री निर्मिती सावंत आणि लोकप्रिय अभिनेता पुष्कर श्रोत्री यांनी देखिल आपल्या खुमासदार सादरीकरणाने या कार्यक्रमाची रंगत वाढवली आहे. स्टार प्रवाहचा धिंगाणेबाज कलाकार अर्थातच सिद्धार्थ जाधवने देखिल कलाकारांसोबत धिंगाणा घालत जल्लोष केला आहे. तेव्हा पाहायला विसरु नका रविवार १ सप्टेंबरला सायंकाळी ७ वाजल्यापासून स्टार प्रवाह परिवार गणेशोत्सव २०२४.

स्टार प्रवाह संपर्क : सोनाली शिगवण मो.९९३०९२३२४८

# संकटाच्या परिस्थितीत लैंगिक आणि पुनरुत्पादक आरोग्यासाठी किमान प्रारंभिक सेवा पॅकेज देण्याचा आरोग्य दुतांनी निर्धार केला

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

सोलापूर /प्रतिनिधीः फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, सोलापूर व इंडियन रेड क्रॉस सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूरच्या डॉक्टर, परिचारिका, अधीपरिचारिका व समुपदेशक यांच्याकरिता स्प्रिंट ४ प्रकल्प अंतर्गत संकटाच्या परिस्थितीत, आपत्ती व्यवस्थापनात लैंगिक आणि पुनरुत्पादक आरोग्य साठी किमान प्रारंभिक सेवा पॅकेज विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन पंढरपूरच्या उपजिल्हा रुग्णालय करण्यात आले होते. कार्यशाळेचे उद्घाटन उपजिल्हा रुग्णालय पंढरपूरचे नोडल वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रदीप केचे सर डॉ. प्रदीप केचे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे चेअरमन डॉ. राजीव प्रधान हे होते. यावेळी व्यासपीठावर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सोलापूरच्या सहाय्यक आपत्ती व्यवस्थापन अधिकारी अर्चना बिसोई, डॉ. प्रसन्न भातलवंडे, फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे चेअरपर्सन डॉ. एन. बी. तेली, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, डॉ. धनंजय सरवदे, डॉ. अविनाश वुईके, डॉ. विनिता कार्यकर्ते, डॉ. शितोळे, मेट्रन सिंधुबाई लवटे, दमानी रक्त संकलन केंद्राच्या जनसंपर्क अधिकारी अमरजा थिटे, समुपदेशक बाजीराव नामदे, पुरुषोत्तम कदम आदी उपस्थित होते. कार्यशाळेचे नियोजन वैद्यकीय अधीक्षक डॉ. महेश सूडके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यशाळेत डॉ. राजीव प्रधान यांनी आपत्ती व्यवस्थापन याविषयी, अर्चना बिसोई यांनी आपत्ती व्यवस्थापनात प्रजनन आरोग्याच्या सेवा, वीरेंद्र परदेशी यांनी गरोदर माता, नवजात बालमृत्यू आणि विलंब टाळणे व अनपेक्षित गर्भधारणा रोखणे या विषयावर, अमरजा थिटे यांनी आपत्ती व्यवस्थापनात प्रथमोपचार व सी.पी.आर. विषयी प्रात्यक्षिक करून दाखवले तर शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांनी स्प्रिंट ४ प्रकल्पात दिल्या जाणाऱ्या मिनिमम इनिशियल सर्विस पॅकेज फॉर सेक्श्युअल अँड रिप्रॉडक्टिव्ह हेल्थ सेवा कशा दिल्या जाऊ शकतात याविषयी मार्गदर्शन केले.या कार्यशाळेतील डॉक्टर, परिचारिका व समुपदेशक यांनी लैंगिक हिंसाचर रोखणे, महिलांना तातडीच्या आरोग्य सेवा मिळणे, एच.आय.व्ही.सहज जीवन जगणाऱ्या रुग्णांना आपत्तीव्यवस्थापनामध्ये ए.आर.टी. औषधोपचार मिळणे, त्यांचा मृत्यू दर कमी करणे, त्यांना योग्य ती वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे, एल.जी. बी. टी. क्यु. घटकासोबत काम करताना गुप्त रोगावर औषधोपचार व इतर सेवा उपलब्ध करून देणे, अनपेक्षित गर्भधारणा टाळण्यासाठी समुपदेशन व मार्गदर्शन व आरोग्याच्या सेवा, बालमृत्यु रोखणे, माता मृत्यू रोखणे, सुरक्षित गर्भपात काळजी व सर्वसमावेशक प्रजनन आरोग्य व कुटुंब कल्याणाच्या सेवा मिनिमम इनिशियल सर्विस पॅकेज फॉर सेक्श्युअल अँड रिप्रॉडक्टिव्ह हेल्थ सेवा अर्थात किमान प्रारंभिक सेवा पॅकेज अंतर्गत उपलब्ध करून देण्यासाठी कटीबद्ध राहणार असल्याचा निर्धार केला.